Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# आधुनिक अध्यापन शास्त्र आणि अध्यापन

**श्री.बेंडकोळी सिताराम देवराम,**
**मु.पो.राजूर.ता.अकोले.जि.अ'नगर.**
**एम. फिल .(2013-2015)**

## प्रस्तावना -

अध्ययन - अध्यापन प्रक्रिया ही पृथ्वीवरील मानवाच्या अस्तिवाइतकीच जुनी आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. प्राचीन काळा पासुन अध्यापन पध्दतीत बदल होत आले आहेत. मानवाची स्वत:ची भाषा निर्माण होण्याच्या अगोदर मानव आपले विचार खुणांच्या साहयाने पटवुन देण्याचा प्रयत्न करीत होता. त्यानंतर भाषा हेच दुसऱ्याला ज्ञान देण्याची प्रभावी साधन ठरले.कालांतराने भाषेचा वापर करतांना काही माध्यमांचा मानव विचार करु लागला. भाषा ही मुले अनुकरणाने व नैसर्गिक उपजत शक्तीमुळे शिकतात. विचार प्रवर्तन हा अध्यापनाचा पाया आहे .

अमुर्त कल्पना स्पष्ट करण्यासाठी मानव चित्रे, आकृत्या, तक्ते इ. चा वापर करु लागला या सर्व प्रयत्नामुळे अनेक अध्यापन पध्दतींचा जन्म झाला. प्रत्येक विषयासाठी वेगवेगळया अध्यापनपध्दती वापरतात कारण उदिश्टांची पुर्तता करण्यासाठी योगया त्या अध्यापन पध्दतींचा वापर करावा लागतो. आणि म्हणुच अध्यापन प्रक्रियेत सर्वात म्हत्वाचा घटक म्हणजे अध्यापन पध्दती.

## अध्यापन म्हणजे काय ?

अध्यापनाची पूर्वी मान्य असणारी व्याख्या जी अध्यापनाचा एक मर्यादित असा अर्थ व्यक्त करते ती म्हणजे 'दुसऱ्याला काहीतरी सांगणे' किंवा 'अध्ययनकर्त्यांना माहिती देण्याची प्रक्रिया.'

बर्टन यांनी अध्यापनची अगदी संक्षिप्त पण सर्वसमावेशक व्याख्या दिलेली आहे. ''अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे,मार्गदर्शन करणे, दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे होय.'' चालना देणे म्हणजे अध्ययनकर्त्याला नवीन ज्ञान कौशल्ये प्राप्त करण्यासाठी प्रेरित करणे अथवा उदयुक्त करणे. अध्ययनासाठी प्रेरित करतांना शिक्षकाला विदयार्थ्यांच्या पार्श्वभूमीचा विचार करुन बाहय व आंतरिक प्रेरणा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात काही अनुभूतींची योजना करावी लागते.

अध्यापनामुळे शिक्षक व विदयार्थ्यांत आंतरक्रिया होऊन विदयार्थ्याना अज्ञात आशय तर प्राप्त होतोच,


Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

शिवाय शिवाय विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्व, विचारप्रक्रिया विदयार्थ्याचे वर्तन ,इतरांशी आंतरक्रिया करण्याची पध्दती यांतही बदल होत जातात. म्हणूनच अध्यापन ही उदिदष्टांवर आधारीत प्रक्रिया आहे. विदयार्थ्यांत नेमके कोणते बदल घडवायचे आहेत त्यानुसार अध्ययन अनुभूतींची योजना करणे, अध्ययनाला पोषक वातावरण निर्मिती करणे अभिप्रेत आहे .

अध्यापन ही मार्गदर्शनाची कृती आहे म्हणजेच अध्ययनकर्त्याच्या क्षमता, कौशल्ये,अभिवृत्ती यांचा जास्तीत जास्त उपयोग करुन बाहय वातावरणाशी जुळवून घेण्यात विदयार्थ्यांना सहाय्य करणे.

**अध्यापन करताना कोणत्या पध्दतींचा उपयोग केला जातो.**

प्रथमत: अध्यापन पध्दती म्हणजे काय ? ते पाहू




मानवाची प्रत्येक कृती सहेतुक असते ,त्याच प्रमाणे अध्यापन हे देखील सहेतूक असतणे अभिप्रेत आहे.अध्यापनप्रक्रियेमध्ये शिक्षक,विद्यार्थी व अभ्यासक्रम हे तीन ध्रुव असतात.शिक्षक अध्यापनाचे कार्य करीत असतात.विद्यार्थी अध्ययनाचे कार्य कार्य करीत असतो व शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टे पूर्ण व्हावीत याससठी शालेय सर्व अनुभवांचा समावेश ज्यामध्ये होते त्याला अभ्यासक्रम असे म्हणतात.

शिक्षकाची भूमीका प्रथमत: ज्ञान संपादन करणे,त्याचा विचार करून मनात मांडणी करणे-आशयाची पूर्ण तयारी केल्यानंतर ज्ञान कोणास द्यावयाचे आहे,त्याचा मानसशास्त्रीय विचार करणे.व ही प्रक्रिया अध्यापन पध्दतीच्या सहाय्याने पूर्ण करता येते. सारांश, ज्ञानदान (अध्यापन) व ज्ञानग्रहण (अध्ययन) यांना जोडणारा प्रभावी ''दुवा'' म्हणजे ''अध्यापनपध्दती होय.''

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

**व्याख्या :-**

अध्ययनार्थींच्या मनावर अध्यापन वस्तूचा प्रभावी परिणाम घडवून आणण्यासाठी अध्यापन वस्तूंची क्रमबध्द सुसूत्र मांडणी करणे याला अध्यापनपध्दती असे म्हणतात.

प्रभावी अध्यापनासाठी विविध अध्यापन पध्दतीचा वापर करणे हे अनिवार्य आहे कारण कोणतीही एक पध्दती सर्व प्रकारच्या आशयासाठी सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यासाठी व सर्व प्रकारच्या उदिदष्टांसाठी परिपूर्ण नाही किंबहुना भिन्न विद्यार्थी भिन्न उदिदष्टे भिन्न आशय यासाठी एकमेव प्रभावी अध्यापनपध्दती शोधण्याचा अट्टाहास योग्य नाही.

**अध्यापन प्रभावी कसे करावे ?**

अध्यापन म्हणजे विद्यार्थ्याच्या डोक्यात ज्ञान कोंबणे नव्हे. बाहय परिसरातील चेतकांना मनाने व्यक्त केलेली प्रतिक्रिया म्हणजे अध्ययन व या अध्ययनासाठी विद्यार्थ्याच्या मनाची तयारी प्रक्रिया म्हणजे अध्यापन. हे अध्यापन व त्याचप्रमाणे अभ्यासक्रमातील विषयांस अधिक प्रभावी आणि परिणामकारक करण्यासाठी शिक्षक अनेक सुत्रे, प्रयुक्त्या व तंत्रे यांचा वापर करत असतो.

अध्यापनाच्या प्रयुक्त्या व तंत्रे यांच्या नुमक्या व्याख्या करता येणार नाहीत कारण दोन्हींचे अर्थ एकमेकांत मिसळलेले आहेत.

''अध्यापन कार्यामध्ये शिक्षक ज्या कृतींचा अथवा कार्याचा अध्यापन सफल करण्यासाठी अवलंब करतो अशा कृती किंवा कार्य म्हणजे अध्यापनाच्या प्रयुक्त्या होत. ''

''अध्यापनाचे तंत्र म्हणजे अध्यापनविषयक घेतलेला पवित्रा होय. '' अध्यापन तंत्र ठरवितांना अध्यापनाच्या प्रयुक्त्या किंवा क्लृप्त्यांचांही अवलंब करावा लागतो. अध्यापनाच्या प्रयुक्त्या व तंत्रे वापरण्याचा उददेश एकच असतो- तो म्हणजे विद्यार्थ्याना आकलन सुलभ होण्यासाठी अध्यापन प्रभावी करणे होय. त्याच प्रमाणे अध्यापन प्रभावी, परिणामकारक व टिकाऊ होण्यासाठी ते काही तत्वांच्या आधारे व्हावे अशी अपेक्षा असते व त्या करिता अध्यापन सुत्रांचा वापर अधिक प्रेरणादायक ठरतो. '''सूत्र' म्हणजे सर्वसामान्य तत्व अथवा वर्तनाबाबत स्वीकारलेला नियम. '' अध्यापनाची सुत्रे मानसशास्त्रांवर आधारित आहेत. सुत्रांच्या वापरामुळे अध्यापन सुलभ व मनोरंजक होते. सुत्रांचा अवलंब करुन अध्यापन विषय सोपा करुन सांगता येतो, त्यामुळे विद्यार्थी शिकण्यात रस घेतात. शिक्षकांनी या सुत्रांचा वापर करतात विद्यार्थ्यांचा वयोगट, क्षमता आणि विषयाची काठिण्य पातळीचा विचार करणे आवश्यक ठरते.

**अध्यापनाची सूत्रेः-**

1) ज्ञाताकडून अज्ञाताकडे [Procaad from known to unknown]

2) सोप्याकडून अवघडाकडे [Procaad from simple to complex]

3) मूर्ताकडून अमूताकडे [Procaad from concrete to Abstrcvt]

4) विशिष्टाकडून सामान्याकडे [Procaad from particular To Genearal ]

**ज्ञाताकडून अज्ञाताकडे -**

अध्यापनात सर्वात महत्वाचा भाग म्हणजे विद्यार्थ्यांना जे माहीत आहे- त्या पूर्वज्ञानाचा धागा पकडून नविन ज्ञानाची ओळख करुन देणे- म्हणजेच काय तर विद्यार्थ्यांना जी गोष्ट ज्ञात आहे तीची त्यांना माहित नसलेल्या अज्ञात अशा गोष्टीशी सांगड घालणे, यालाच ज्ञाताकडून अज्ञाताकडे हे सूत्र वापरतात.

**मूर्ताकडून अमूर्ताकडे -**

ज्या गोष्टीचा किंवा बाबींचा आपण आपल्या इंद्रियांद्वारे प्रत्यक्ष अनुभव घेवू शकतो 'मूर्त' असे म्हणतात व ज्या अनुभूती केवळ मानसिक व भावनिक स्तरावर अनुभवल्या जातात त्यांना 'अमूर्त' असे म्हणतात.

**अध्यापनाची तंत्रे -**

1) निरिक्षण तंत्र

2) चर्चा तंत्र

**निरिक्षण तंत्रः-**

अध्ययन प्रक्रियेत निरिक्षण तंत्राला अनन्यसाधारण महत्व आहे. व्क्तीने संपादन केलेल्या ज्ञानात ज्ञानेंद्रियांचा सहभाग किती? या प्रश्नाच्या अनुषंगाने झालेल्या संशोधनांच्या निष्कर्षावरुन असे दिसते की व्यक्तीने संपादन केलेल्या एकूण ज्ञानाच्या सुमारे 85 टक्के ज्ञान हे दृक इंद्रिय म्हणजे डोळयांद्वारे ग्रहण केलेले असते म्हणूनच अध्ययनात निरिक्षण तंत्राला अनन्यसाधारण महत्व आहे.

**चर्चा तंत्र -**

एखादया प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी वा सत्यशोधणासाठी वादविवाद टाळून केलेली शाब्दिक धडपड म्हणजे चर्चा.

**अध्यापन पध्दती -**

1) व्याख्यान पध्दती 2) दिगदर्शन पध्दती 3) प्रयोगशाळा पध्दती
4 )प्रकल्प पध्दती 5) प्रश्नोत्तर पध्दती 6) उदगामी पध्दती
7) प्रवास पध्दती 8) सहल पध्दती 9) प्रादेशिक पध्दती
10) स्वयंशोधन पध्दती 11) संगणक सहाय्यक अनुदेशन पध्दती

वरील सर्व अध्यापनपध्दतींची माहिती विस्ताराच्या भयाने येथे दिलेले नाही,आपण ती सविस्तर पाहावी.सध्या शिक्षण हक्क कायदा अधिनियम 2009 अन्वये अध्ययन अध्यापन पध्दतींमध्ये अनेक आमूलाग्र असे बदल करण्यात आले आहेत .उदा.

1) आनंददायी अध्ययन-अध्यापन 2)भयमुक्त शिक्षण
3) वयानुरूप शिक्षण 4) भयमुक्त परीक्षा आणि पुढील वर्गात प्रवेश

या बरोबरच जोडीला संगणक शिक्षण असे कोणतेही क्षेत्र नाही की तेथे संगणकाचा वापर करता येणार नाही.

**संगणकामुळे शिक्षण व्यवस्थेत झालेले बदल:**

1) ऑनलाईन परीक्षा घेणे शक्य झाले.

2) घरी बसून शिक्षण मिळते.

3) इंटरनेटमुळे संदर्भ ग्रंथ,माहिती,पुस्तके यांची माहिती मिळू लागली.

4) वेळ व पैशाची बचत झाली.

5) विविध शैक्षणिक साधनांचा विकास झाला.

वरील सर्व बाबींची साथ घेत अध्ययन -अध्यापनामध्ये योग्य ते बदल करून परीवर्तन करणे काळाची गरज आहे.

**सारांश -**

आधुनिक अध्यापन शास्त्र आणि अध्यापनामध्ये आपण अध्यापन म्हणजे काय ? नवनवीन अध्यापन पध्दती, प्रभावी अध्यापन कसे करावे अध्यापनाची काही सुत्रे व तंत्रे, संगणकाचे अविभाज्य अंग या बाबींचा सविस्तर विचार केला आहे.शिक्षण हक्क,बाल आनंददायी अध्ययन-अध्यापन पध्दतींचाही यात समावेश केला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची:-**

1) जरग नामदेव. (संचालक ),(2012)'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009.
2) पारसनीस न.रा.(2005),'शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमीका'नूतन प्रकाशन पुणे.
3) पाटील विजय '(1996),'चाकोरी बाहेरील शिक्षण'महाराष्ट्र राज्य मा.व उच्च माध्य.मंडळ,पुणे.
4) मिसाळ,चंद्रकांत. (2010),'शिक्षणाधिकारी लेखी परीक्षा, समर्थ ऑफसेट,पुणे.
5) सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापन मार्गदर्शीका भाग 1 व 2.

GoEIIRJ